सिडको
शहरांचे शिल्पकार

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित**
कार्मिक विभाग
सिडको भवन, २ रा मजला, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
दुरध्वनी क्रमांक: ०२२-६७९१८२५१ ईमेल: mp@cidcoindia.com

सिडको/कार्मिक/भरती/२०२३ / E-215822 दिनांक ०६/०६/२०२३

# परिपत्रक

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात महामंडळातून सेवा निवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल हे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेकरीता उपयुक्त असल्याने, सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ते भरुन घेणे आवश्यक आहे. महामंडळातील जे अधिकारी/ कर्मचारी सन २०२३-२४ मध्ये महामंडळातून सेवानिवृत्त होत आहेत, त्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी त्यांचे व त्यांच्या अधिनस्त असलेल्या कर्मचाऱ्यांचे सन २०२३-२४ या कालावधीतील गोपनीय अहवाल भरणे आवश्यक आहे.

जे अधिकारी/कर्मचारी माहे एप्रिल-२०२४ पूर्वी सेवानिवृत्त होणार आहेत, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांनी एप्रिल २०२३ ते सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंतच्या गोपनीय अहवालांचे स्वयंमुल्यनिर्धारण/प्रतिवेदन/पुनर्विलोकन करणे/करुन घेणे आवश्यक आहे.

या परिपत्रकाद्वारे अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांना एप्रिल २०२३ ते सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंतचे वार्षिक गोपनीय अहवाल ESS-MSS मध्ये सेवा निवृत्तीच्या महिन्यात उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरचे गोपनीय अहवाल सेवानिवृत्तीपूर्वी सादर करावेत. सेवानिवृत्तीपूर्वी स्वयंमुल्यनिर्धारण/प्रतिवेदन/पुनर्विलोकन न करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना कोणतेही फायदे देय राहणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

(फैयाज खान) 06/06/23
व्यवस्थापक (कार्मिक)

प्रति,
सर्व विभाग प्रमुख : सदर परिपत्रक विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावे.

माहितीस्तव प्रत :

१. मा. व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक
२. मा. सहव्यवस्थापकीय संचालक-१ यांचे स्वीय सहाय्यक
३. मा. सहव्यवस्थापकीय संचालक-२ यांचे स्वीय सहाय्यक
४. मा. सहव्यवस्थापकीय संचालक-३ यांचे स्वीय सहाय्यक
५. मा. मुख्य प्रशासक (नवीन शहरे) यांचे स्वीय सहाय्यक
६. मा. मुख्य दक्षता अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
७. सुचना फलक
८. व्यवस्थापक (प्रणाली) : इंट्रानेट वर प्रसिध्दीसाठी

Amrita

SYSTEM DEPARTMENT
CIDCO/SD/SM
Inward No. 903
SAP No. E-215822
Date 07-06-2023